UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

## पुरवणी अंक १ – डिसेंबर २०२२

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणी अंक : १

संपादक मंडळ
● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक
● प्राचार्य डॉ.विश्वास शा.कंधारे ● डॉ.तबस्सुम मु.इनामदार ● प्रा.अफरोज अ.सय्यद

✲ प्रकाशक ✲
**श्री. संजय मुंदडा**
कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ
सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ अणाभाऊ साठे : एक मार्क्सवादी तत्वज्ञ
- डॉ. आर. डी. आचार्य , परळी वैजनाथ ---------- ४

२ अण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक
- डॉ. मुक्ता निवृत्ती बिरादार, हदगाव, जि.नांदेड. ---------- ८

३ अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि विचार
- डॉ.प्रा.डॉ.पंजाब शेरे, किनवट, जि.नांदेड ---------- ११

४ अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरीतील समाज प्रबोधन
- डॉ.रमेश शेवाळे, मुक्ताईनगर, जि.जळगाव ---------- १४

५ अण्णाभाऊंची 'माझी मैना' या छक्कडमधील सामजिकता
- डॉ. शिवाजी गायकवाड, उस्मानाबाद. ---------- १८

६ अण्णाभाऊ साठे : मानवतावादी साहित्यिक
- डॉ.सहदेव रसाळ, उस्मानाबाद. ---------- २३

७ अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे मानवतावादी स्वरूप
- प्रा. मारोती गोविंदराव गायकवाड, लातूर. ---------- २८

८ Feministic Concern in Anna Bau Sathe's Waijayanta, Alguj and Ratna
- Dr. Ambadas Dadasaheb Sakat, Wai, Dist.Satara ---------- ३२

९ Anna Bhau Sathe's Literature: Voice against Silencing Culture
- Dr. Ahilya B. Barure, Ambajogai, Dist.Beed ---------- ३६

१० Ambedkarite and marxist ideology reflected in Anna bhau Sathe's literary writing
- Raghu Shivaji Gavane, Parli, Dist.Beed ---------- ३९

११ Rethinking Anna Bhau Sathe: A Social Reformist and Voice of Dalit Anguish
- Dr. Tabassum Inamdar, Georai, Dist.Beed ---------- ४२

१२ Disparate Subaltern Voices-A Study of Annabhau Sathe's and Mahasweta Devi's works - Dr.Kirti Nakhare, Mumbai ---------- ४७

१३ Anna Bhau Sathe's Scientific Approach
- Dr.Kishor Ingole, Hingoli ---------- ५१

१४ Feminine Sensibilities in the Select Short Stories of Anna Bhau Sathe
- Dr.P.A.Waghmare, Muktainagar, Dist.Jalgaon ---------- ५६

१५ Psycho - Social Impact of Anna Bhau Sathe's life and works
- Dr.Pragati Barthwal, Dehradun ---------- ५९

१६ Anna Bhau Sathe's Fakira: A Voice of Marginalized Society
- Dr.Shivkumar Rautrao, Latur ---------- ६३

१७ Economic Marginality and Gendered Subalternity in Anna Bhau Sathe's Chitra
-Dr.Dhananjay Sathe, Pandharpur, Dist.Solapur ---------- ६७

१८ Anna Bhau Sathe: A Novelist of Undertroden
- Dr.Shailaja Kuchekar, Kada ---------- ७१

 ISSN No. 2394-5990

१९ Anna Bhau Sathe: The Greatest Novelist
- Dr. Shaili Gupta, Dehradun, Uttarkhand -------------------------- ७३

२० The Perception of Lokshahir Anna Bhau Sathe's Literature : Analytical Study
- Dr. Vijay Tunte, Amalner, Dist.Jalgaon ---------------------------- ७७

२१. Reflection of Protest of subaltern community in Annabhau Sathe's Novels "Fakira and Warnecha Wagh" - Dr.Dhananjay Waghdare, Pandharpur, Dist.Solapur --- ८१

♦♦♦

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे मानवतावादी स्वरुप

**प्रा. गायकवाड मारोती गोविंदराव**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ जि. लातूर
इमेल maroti2680gmail.com

अण्णा भाऊ साठे हे मराठीतील थोर मानवतावादी साहित्यिक आहेत. अण्णाभाऊंनी आपल्या समग्र साहित्यातून मानवी मूल्यांची जोपासना केली आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यात वर्ग संघर्षाचा सिध्दात मांडणारे कार्ल मार्क्स व मानवतावादी विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रेरणेने लेखन केले आहेत. म्हणजेच अण्णाभाऊ हे जागतिक कीर्तीच्या दोन मानवतावादी विचारवंताचा प्रभाव आहे. अण्णाभाऊ सुरुवातीच्या काळात मुंबईत गिरणी कामगार चळवळीत कार्य केले. त्यामुळे आपोआपच ते मार्क्सवादी प्रेरणेने साहित्य निर्मिती केले. परंतु या देशात आर्थिक विषमते बरोबर सामाजिक विषमता त्यांना जाणवली. त्यामळे अण्णाभाऊंनी या दोन्ही विषयाच्या अनुषंगाने लेखन केले आहेत. अण्णाभाऊ दलित, शोषित, कष्टकरी, कामगार यांचे शोषण करणारी व्यवस्था त्या विरोधात आपला लढा उभारला आहे. त्यामुळे ते सुरुवातीस गिरणी कामगार म्हणून जीवन अनुभवलयामुळे मार्क्सवादी विचाराची मांडणी त्यांच्या साहित्यातून दिसून येते. अण्णाभाऊ हे स्वतः या देशातील वर्णव्यवस्थेतील क्षुद्र जातीत जन्मल्यामुळे त्यांना जातीयतेचे ही चटके सहन करावे लागले. त्यामुळे अण्णा भाऊ साठे यांनी आर्थिक विषमतेच्या विरोधात त्यांची लेखणी चालवली. त्याबरोबरच सामाजिक विषमता ही तेवढीच प्रखर असल्यामुळे मानवी मूल्ये पायदळी तुडवल्या जात असल्यामुळे हे अण्णाभाऊ स्वतःच्या अनुभवातून त्यांना ते जाणवले. अण्णाभाऊंनी कार्ल मार्क्सच्या विचाराबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारांचा स्वीकार करुन आपल्या साहित्यात मानवी मूल्याचे स्वरुप प्रकट केले आहेत. अण्णाभाऊचे साहित्यातील हे कार्य म्हणजे माणसाला माणुसकी प्रधान करणारे मानवतावादी साहित्य होय.

अण्णाभाऊचे साहित्य पदोपदी प्रखर देशभक्ती, पुरुषांचा स्वाभिमान, स्त्रीचे शील व मानवी मूल्याची प्रतिष्ठा जपण्याचे कार्य त्यांनी केले. मराठी साहित्यात अण्णाभाऊंनी प्रथमच अशी नवी संविधाना अभिप्रेत नवी मूल्यांकित साहित्याची निर्मिती केली आहे. अण्णाभाऊ ची विचारधारा ही शोषित, वंचित, पीडित माणसांना न्याय मिळवून देणारी आहे. त्यामुळे अण्णाभाऊच्या साहित्यात गुलामगिरीच्या जोखडातून शोषित, पीडित माणसाला मुक्त करण्याचे कार्य अण्णाभाऊंनी केले आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यावर मार्क्स व डॉ. आंबेडकर यांच्या विचाराचा प्रभाव असल्यामुळे ते या देशातील आर्थिक विषमता व सामाजिक विषमता यामुळे माणसा-माणसांमधील भेद करणारी व्यवस्था मानवी मूल्ये पायदळी तुडवली जाणारी देव आणि देव वादात अडकलेली, धार्मिक जोखडाखाली अडकून पडलेले ही रुढीवादी परंपरा नाकारण्याचे कार्य अण्णाभाऊंच्या साहित्याने केले आहे. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यात मानवी मूल्याचा पुरस्कार करून ते साहित्य निर्माण केले आहेत. अण्णाभाऊ आपल्या साहित्यात जसे सुरुवातीच्या काळात कार्ल मार्क्स व लेनिन यांचा विचार मांडले. त्याबरोबरच त्यांनी गौतम बुध्द, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा महामानवांच्या विचारधारेचा स्वीकार करुन या देशातील शोषित, पीडित, वंचित, दलित, उपेक्षित, कष्टकरी, कामगार व जनमानसांना न्याय मिळवून देण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्याची निर्मिती केली आहे.

अण्णाभाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेने मराठी साहित्यात आर्थिक विषमते बरोबर सामाजिक विषमता यावर आसूड ओढले आहेत. म्हणून त्यांच्या साहित्यात या मनुवादी व्यवस्थे विरोधातील विद्रोह, नकार आणि संघर्ष ही नवी मूल्ये मांडली आहे. ही मूल्ये मानवतेच्या कल्याणासाठी पोषक ठरले. अण्णाभाऊच्या साहित्यात श्रमिक, कष्टकरी माणसांच्या दुःखाचे चित्रण असले तरी हे जपण्याचे कार्य अण्णाभाऊंच्या अनेक पात्रांनी केले आहे. या व्यवस्थेने माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारलेल्या व्यवस्थेला महामानवाचे विचारच तारणारे आहेत. हे अण्णाभाऊंनी निक्षून सांगितले आहे. अण्णाभाऊ चा मूळ पिंड माणुसकीने ओथंबलेला व करुणेने निखळलेला आहे. जे जे म्हणुन कुणी अंधार यात्रिक होते त्यांना सूर्यसन्मुख करण्याचे कार्य

अण्णाभाऊंनी केले. अण्णाभाऊंच्या साहित्याचे स्वरुप हे बहुआयामी होते. आपल्या साहित्यातून जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले. प्रस्थापित व्यवस्थे विरोधाचा विद्रोह मांडला सामान्यांच्या जीवनातील दुःख मांडून त्या दुःखाचे मूळ शोधण्याचे कार्य अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून केले आहे. अण्णाभाऊंची जीवननिष्ठ भूमिका ही त्यांच्या साहित्यात आढळून येते.

अण्णाभाऊ म्हणतात "माझी जीवनामूल्यावर अढळ श्रद्धा असून मला माणसे फार आवडतात." असे ते म्हणत असत. म्हणजेच माणसावरची श्रध्दा व माणसाला माणूसपण मिळवून देणे हेच अण्णाभाऊंच्या साहित्याचे केंद्रबिंदू होय. अण्णाभाऊच्या साहित्य लेखनाचा जो हेतू किंवा उद्देश होता तो उद्देश म्हणजे या समाजामध्ये मानवाला मानवाची प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हा अंतिम उद्देश अण्णाभाऊच्या साहित्याचा होता. अण्णाभाऊंना साहित्य निर्मितीची जी प्रतिभा लाभली होती तिचा वापर त्यांनी वाचकाचे मनोरंजन करणे हे नसून या समाजातील गावकुसाबाहेरच्या व्यवस्थेने शुद्र समजल्या गेलेल्या माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. अण्णाभाऊंच्या साहित्यात चुद प्रेरित दया, प्रेम, करुणा, विवेक, वात्सल्य ही विशेष अण्णाभाऊच्या साहित्यात जाणवतात. त्याचबरोबर आंबेडकरी विचार स्वातंत्र्य, समता, न्याय तसेच बंधुभाव या सर्व मानवतावादी मूल्याची भूमिका घेऊन अण्णाभाऊ साहित्य निर्मिती केले आहेत.

अण्णाभाऊ 'वैजयंता' कादंबरीच्या प्रस्तावनेत ते म्हणतात माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे, हा देश सुखी समृध्द व्हावा, इथे समता नांदावी, या भूमीचे नंदनवन व्हावे, अशी मला दररोज स्वप्ने पडत असतात ती मंगल स्वप्ने पहात पहात मी लिहित असतो ही अण्णाभाऊची भूमिका म्हणजेच मानवतावादाची अंतिम मूल्येच आहेत. अण्णाभाऊंच्या साहितयातील पात्र माणूस होण्यासाठी जीव पाखडतात हे सूत्र त्यांना गवसल्यामुळे त्यांची पात्र जगण्याच्या सूत्रात बांधत अण्णाभाऊंनी ती सकारली आहेत. तर अण्णाभाऊंच्या साहित्यात सौंदर्य, सत्यता आणि सभ्यता या अंगाने त्यांच्या साहित्यात ते विद्रोही अर्थ उतरू लागले आहेत. अण्णाभाऊंच्या साहित्याचा सूर हा नेहमी सामान्य माणसाचा कष्टकरी, शोषित, वंचित, श्रमिक व झोपडपट्टीतील विश्वाचा आणि त्यासाठी नवनिर्मिती करण्याचा हेतू त्यांच्या साहित्याचा होता.

अण्णा भाऊ साठे मानवतावाद अंगी बाणून आयुष्य जगले. माणसाकडे पाठ फिरवू नये. माणुसकी जतन करावे, शोषित माणसांचा मानवतावाद हा अनेक पातळीवर अण्णा भाऊंनी पाहिले आहेत. हा मानवतावाद त्यांच्यात असल्यामुळे त्यांच्या समग साहित्यातून ती मानवी मूल्ये जतन करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. मानवतावाद हे अण्णाभाऊंच्या लेखणीच अस्त्र होतं ते कसं सादर झालंय त्याला समाज जीवनात प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य केले आहेत. अण्णाभाऊंनी 'डोंगराचा राजा' या कथेतला मानवतावाद रेखाटताना म्हणतात 'मराठयाची मुलगी स्वतःची मुलगी समजून तिला नांदायला लावणं' ही मानवता सावळा मांगाच्या व्यक्तीचित्रणातून अण्णाभाऊंनी मांडली. 'जेवून जा म्हटल्यावर खाल्ल्या मिठाला जागणं' हा मानवतेचा दुसरा संदेश या कथेत मांडलाय 'राजारामला मारुन काशीला रंडकी करायची नाही' ही मानवता या कथेतून आली आहे. तरी इंग्रजी फौजदार सावळावर धावून येतात तेव्हा मसावळाला नाना बाप समजणारी काशी आपल माहेर अक्षय ठेवण्याची देवाला विनवणी करते ही यातली मानवता चिरंतन स्वरुपाची आहे.

अण्णाभाऊंची 'सापळा' ही त्या काळानुरुप जातीयवादावर असणारी कथा असली तरी त्यात मानवता जपली जात होती. कथेचा शेवट करताना अण्णाभाऊ मांडतात, पाटील म्हणाला 'पर गावाशिवाय महार वाड्याला शोभा न्हाय नि महार वाड्याशिवाय गावाला कळा न्हाय ही पांढरं साऱ्यांचीच हाय साऱ्यांनी एका आईच्या लेकरावानी न्हाव' तसं कसं हरिबा दुःखी आवाजात म्हणाला, 'जर तसं असतं तर गावांना आमच्या भोवती त्यो सापळा लावलाच नसता. आता त्योच आपला आम्ही काढून टाकतो.' पाटील म्हणाला 'हातनं मोरं आपण सरळ बागूया सरळ कसं ?' मध्येच हरिबान विचारलं आणि पाटील म्हणाला 'अरं बाबा माणसावानी !' म्हणजेच या उद्‌गारावरून अण्णाभाऊच्या साहित्यात निखळ मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त झाल्याचे दिसते. अण्णाभाऊच्या भोमक्याफकथेत मानवतावाद ठासून मांडला आहे. भोमक्या माणूस होता आणि त्यांच्या शरीराची ओबडधोबड बेढब रचना हीच मुळी प्रतिष्ठेच्या बुरख्याखाली वावरणाऱ्या समाजाचे अंतरंग टाहो फोडून जाहीर करत होती. प्रतिष्ठेचा बुरखा मानवतेला असणारा डाग अण्णाभाऊ या कथेतून वाचकांना दाखवतात. भोमक्यामुळे व्याकुळ झालेली अण्णाभाऊंच्या मनातील व्याकुळता ही मानवतेच्या रुपानेच व्यक्त झाली आहे.

अण्णाभाऊच्या 'खुळंवाडी' या कथेत मानवता म्हणून आलेला प्रसंग असा आहे की खुळंवाडीतील सर्व खुळे त्या खुळंबाच्या देवळात जमले होते कारण एका दहा वर्षांच्या मुलीला एकाएकी देवळात रडत उभी असलेली पाहून आश्चर्यचकित झाली होती. प्रत्येकाच्या डोक्यात एकच प्रश्न नाचत होता की ही पोरगी कुणी सोडली आणि त्या गर्दीत सखुबा खुळा सर्व पुढे बसून त्या पोरीला समजावत होता गोंजारीत होता आईच्या नाव विचारत होता. त्या मुलीला आधार देत चौकशी करण्याचा मानवतावाद इथे दिसून येतो. कारण इथे मुलीची चौकशी करुन खुळंवाडीची माणसं थांबत नाहीत तर सर्वांनी मिळून मग असं करु या 'आजपासून ही पोरं आपल्या गावाची लेक समजुया नेहमी सांभाळू मया' सखुबानं सर्वांकडे हुकमी नजर भिरकावीत सांगितलं म्हणजेच इथे अण्णाभाऊंच्या कथा लेखनाचा मानवतावादी विचार अतिशय तळमळीने जाणवला आहे.

अण्णाभाऊंच्या 'माकडीचा माळ' या कादंबरीतील मानवता ही अशाच पध्दतीने व्यक्त झाली आहे. लोकांची पिकं, लोकांचा शेतशिवार बघून भटक्या जमातीतील माणसे स्वतः या व्यवस्थे कडून त्रास सहन करून सुध्दा ते इतरांच्या शेतशिवारातील पिके पाहून आनंदी होतात, हे त्या भटक्या जमातीतील लोकांचा दृष्टिकोन म्हणजे 'जग सुखी तर आपण सुखी' असा दुसऱ्याच्या सुखात आनंद व्यक्त करणारी मानवतावादी वृत्ती अण्णा भाऊंच्या माकडीचा माळ या कादंबरीतून चित्रीत झाली आहे.

अण्णाभाऊंची मराठी साहित्यातील सर्वश्रेष्ठ 'फकिरा' कादंबरीचा जन्मच मुळी मानवता वादातून झल्याचे वाटते. या कादंबरीत असणारी व जाणवणारी मानवता ही वाचक-रसिक माणसांना बरंच काही शिकवून जाते. या कादंबरीतील 'सत्तू भोसला हा मराठा व फकिरा मांग' पण अण्णाभाऊ मानवता सांगताना सत्तू म्हणतो रोज पहाटे आवृक्ष मागणारी बहिण असावी आणि भाऊ हा असा फकिरासारखा असावा. सुदैवाने मला दोघेही आहे चला. ही फकिरा कादंबरीतील फकिरा व सत्तू भोसले यांचे नाते मानवतावादी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे किंवा जेव्हा गाव दुष्काळाच्या दाढेत असताना दुष्काळामुळे उभ्या गावाचे प्रतिनिधित्व करत प्रांताशी संघर्ष करणारा पंत हा ब्राहमण असुन सुध्दा तो गावातील बहुजन कष्टकरी, श्रमिक, शोषित, पीडित लोकांची बाजू घेऊन उभा राहणारा पंथ ब्राहमण बहुजन यात न अडकता त्याचा मानवतावादी धर्म येथे दिसतो आणि माणूस हीच जात आहे असं त्यांच्या वर्तनातून समाज मनाला बिबवत अण्णाभाऊ मानवतेचे पुजारी असल्याचेच या पसंगातून दाखवून दिले आहेत किंवा फकिरा कादंबरी दुष्काळात उपाशीपोटी यातना सहन करुन मरणाऱ्या लोकांना अण्णाभाऊ फकिरा कादंबरीत पंत व फकिरा दोघामधील या संवाद व्यक्त करताना म्हणतात 'तुम्ही कुत्र्यासारखं मरु नका हे दिवस जातील हे जसं जमेल तसं जगा' म्हणणारा पंथ त्याचे रुप खरे तर मानवतावादी आहे. ही मानवतावादी दृष्टी अण्णाभाऊंच्या फकिरा कादंबरीत माणसासाठी आणि माणसे जगवण्यासाठी प्रयत्न करणारी ही मानवतावादाची अनेक रुपे अण्णाभाऊच्या साहित्यातील मुख्य केंद्रबिंदूच म्हणावे लागेल.

अण्णाभाऊंची 'वारणेचा वाघ' ही मानवता वादाच्या खांद्यावर उभी राहिलेली कादंबरी होय. या कादंबरीत सत्तूने मथाजी चौगुलेचा केलेला खून हा सुडाने नव्हे तर मानवता वादातून केलेला आहे. या कादंबरीत शोषित अबला गरोदर महिलावर डोळयादेखत क्षुल्लक कारणासाठी स्त्रीला मारलं जातं म्हणून त्याला समजावूनही न ऐकल्यामुळे सत्तू चौगुलेला अन्याय सहन न झाल्यामुळे इथे ही घटना घडते किंवा हुंड्यापायी बायको न नांदणाऱ्या चितू पाटलाला ही मानवतेच्या भावनेतूनच धमकावतात 'हुंड्यासाठी ही मुलगी सोडशील तर तुला मी हे जग सोडायला लावीन तिला घरात घेसंसार करू ही माझी बहीण आहे. ही माझी बहीण आहे मी तुला हुंडा देईन' ही भावना सोबत सुभद्रेच्या निमित्ताने नात्यापलीकडील मानवतेचे दर्शनच होय. म्हणजेच अण्णाभाऊच्या या वारणेचा वाघ कादंबरीमधुन मानवतावादी दृष्टिकोन पहावयास मिळतो.

अण्णाभाऊचे साहित्य हे माणुसकीने ओथंबलेले आहे. करुणेने व्याकुळ झाले आहे. त्यांच्या समग्र साहित्यातून ही जाणीव होते. ती मानवतावादी विचाराने सजलेली आहे. मुळातच अण्णाभाऊच्या लेखनाची परंपरा या व्यवस्थेला छेद देणारी आहे. म्हणजेच जगातील थोर मानवतावादी विचारवंताचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर झालेला आहे. अण्णाभाऊंची लेखन प्रेरणा ही कार्ल मार्क्स, मॅक्झिम गॉर्की यांच्याबरोबर गौतम बुध्द, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या विचाराचा प्रभाव असल्यामुळे अण्णाभाऊंच्या साहित्यातून ही मानवी मूल्ये जतन करुन ते व्यतीत झाले आहे. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यात जात व धर्म यापलीकडे जाऊन माणसाला माणूसपण मिळवून

ISSN No. 2394-5990

देण्यासाठी सामाजिक सलोखा व माणसावर प्रेम या दृष्टीने रचलेले मानवतावादी साहित्य होय. त्यांच्या एकुण साहित्यामध्ये कथा, कादंबरी, रशियाचा प्रवास ( प्रवास वर्णन) पोवाडे, गीत, लोकनाट्ये सर्व समग्र साहित्यातून अण्णाभाऊंनी वेळोवेळी पदोपदी मानवी मूल्याचे जतन करण्यासाठीच माणसाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठीच हा दृष्टिकोन समोर ठेवून अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याची निर्मिती केली आहे. हा मानवतावाद जगाला तारणारा आहे असे ही आपल्या साहित्यातून मांडले आहेत.

संदर्भ ग्रंथ :


१. अर्जुन डांगळे (संपा) अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
२. अण्णाभाऊ साठे गौरव ग्रंथ (संपा) चंद्रकांत वानखेडे अण्णाभाऊ साहित्य कला अकादमी नागपूर.
३. आसाराम गायकवाड लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे संदर्भ ग्रंथ १९९६ झेप प्रकाशन नाशिक.
४. डॉ. बाबुराव गुरव अण्णाभाऊ साठे समाज विचार आणि साहित्य विवेचन लोक वाङ्मय ग्रह मुंबई.
५. यशवंत मनोहर प्रतिभावंत साहित्यिक अण्णाभाऊ साठे सनय प्रकाश नागपूर.
६. सुरेश पाटोळे अण्णाभाऊ साठे कर्तृत्व आणि व्यक्तिमत्व प्रबुध्द प्रकाशन सोलापूर.


●●●